
दै. गोदातीर दि. 18.06.2025

# धाडसत्र सुरूच : नांदेड परिक्षेत्रात पंधरवड्यात पोलिसांच्या आणखी ९७३ कारवाया

## अडीच कोटींहून अधिक रक्कमेचा मुद्देमाल हस्तगत





**नांदेड (प्रतिनिधी)-** दि. १ जूनपासून, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान-२ सुरू करण्यात आले असून, जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पोलिसांनी १०५९ आरोपींविरुद्ध एकूण ९७३ कारवाया करून २ कोटी ६७ लाख ४६ हजार ५७१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. अवैध व्यवसायांच्या विरोधात सुरू केलेली मोहीम आणखी तीव्र केली आहे.

परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्या व्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ मेपासून नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरू केले आहे.

पोलिसांनी, मे महिन्यात राबविलेल्या अवैध व्यवसायविरोधी अभियान-१ दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या १७२१ इसमांविरुद्ध एकूण १५६१ केसेस करून ७ कोटी ७९ लाख ४७ हजार ४५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला होता. कारवाई दरम्यान, नांदेड येथील स्थानिक गुन्हे शाखेने लोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजाची वाहतूक करताना दोन इसमांना पकडून त्यांचे कडून एकूण १४ लाख १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्याचप्रमाणे, पोस्टे किल्लारी जि. लातूर यांनी १२ लाख ९८ हजार रुपयांचा गुटखा जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. यात नांदेड पोलिसांनी २७ लाख ४५ हजार ७४७, परभणी ७१ लाख ९ हजार ५७८, हिंगोली पोलिसांनी ५४ लाख ९ हजार ४२२ तर लातूर पोलिसांनी एक कोटी चौदा लाख ८१ हजार ८२४ असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कामगिरी बाबत, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.